# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६७ दिनांक १२/०७/२०२१

**वाणगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र.I ५३/२०२१ भा. दं. वि. सं. ३५३, ३५१, १८८, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे**

दिनांक ११/०७/२०२१ रोजी १८.४५ वाजताचे सुमारास कब्रस्तान रोडवर चिंचणी बीच, ता.डहाण, जि. पालघर येथे यातील फिर्यादी सहा.पोउपनि. श्री. कुमार काशिनाथ आवटे, नेम. वाणगांव पोलीस ठाणे, सोबत पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच सागर रक्षक दल सदस्य यांचे सोबत चिंचणी समुद्र किनारी पेट्रोलिंग फिरत असतांना सध्या कोरोना विषाणुचा निर्बंध असल्याने समुद्र बिच, पर्यटनस्थळावर बंदी असल्याचे आदेश झाल्याने बिच वर येणाऱ्या जनतेला परत जाण्यास सांगत असतांना एक ग्रे रंगाची कार क्र.एम.एच.-०२/इपी/९७०६ मधिल आरोपीत १ ते ३ यांना बिच बंद असल्याने परत जाण्यास सांगितले असता त्यांनी कारमधुन खाली उतरुन फिर्यादी यांचेशी हुज्जत घालुन धक्काबुक्की केली. त्यावेळी पेट्रोलींग करित असलेले अधिकारी व अंमलदार यांना सदर ठिकाणी फिर्यादी यांनी बोलावुन घेतले. यातील आरोपीत यांना समजावुन सांगत असताना आरोपीत क्र.१ हे पो.उपन.निरी./अल्पेश विसे यांचे अंगावर धावुन येवुन धक्का बुक्की करुन सरकारी कामात अडथळा केला. नमुद आरोपी क्र. १ ते ३ यांच्यावर वाणगांव पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयांचा पुढील तपास पोउपनिरी/अल्पेश विशे, हे करित आहेत. गुन्हयातील आरोपीत क्र. १ यास दि.१३/०७/२०२१ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर करण्यात आली आहे.

Scanned with CamScanner